पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/५/कावि/३०४/२०१९
दिनांक - ११/१२/२०१९

प्रति,


मा. ..................................
सदस्य,पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/१२/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **डिसेंबर - २०१९** ची मासिक मा.महापालिका सभा **शुक्रवार** दिनांक **२०/१२/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

**सूचना**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक – ३९**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **डिसेंबर – २०१९** ची मासिक मा.महापालिका सभा **शुक्रवार** दिनांक **२०/१२/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

-----

**प्रश्नोत्तरे**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

------

**मा.स्थायी समितीचे ठराव**

**विषय क्रमांक १)** संदर्भ – १) मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५९६५ दि.२७/११/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करताना संबंधित जमिन मालकास मोबदला अदा करताना मा.महापालिका सभा ठराव क्र.३९९ दि. २१/११/२०१३ नुसार मंजूर कार्यपध्दतीत व धोरणानुसार कार्यवाही करावयाच्या प्रकरणात नुकसान भरपाई अदा करताना ३०% दिलासा रक्कम देण्यास मान्यता देणेत आली आहे. तदनंतर मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४ दि.२०/११/२०१५ अन्वये सदर धोरणात बदल करून नविन भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतूदी नुसार ज्या मिळकत धारकांचे क्षेत्र ० ते ३०० चौ मी. आहे अशा बाधित छोट्या छोट्या मिळकतधारकांना १००% दिलासा रक्कम व ३०० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्राचे भूखंड धारकांना ३०% दिलासा रक्कम या प्रमाणे मान्यता देणेत आलेली आहे. सबब, दि.२०/११/२०१५ नंतर ३०० चौ.मी. पेक्षा मोठ्या भूखंडाचे विभाजन करून तुकडा ३०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड केलेल्या सर्व प्रकरणात सांत्वना रक्कम ३०% इतकीच देय राहिल यास मान्यता देणेकामी मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक २)** संदर्भ – १) मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.६०८३ दि.११/१२/२०१९

दिनांक ०१/१२/२०१९ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अग्निशामक विभागातील कर्मचारी कै.विशाल हणमंतराव जाधव यांना महापालिकेची सेवा करताना कंत्राटी कामगारांना वाचवितांना वीरमरण आले आहे. महाराष्ट्र शासनाकडील कंडोम-१०१९/प्र.क्र.१७/ नवि-२८ दि.०५/०८/२०१९ अन्वये कल्याण येथे झालेल्या दुर्घटनांमध्ये अग्निशमन विभागातील जवानांना “शहिद” दर्जा व शहिदांना

अनुदेय असणा-या सवलती व फायदे देण्यात आले आहेत. त्याचधर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अग्निशामक विभागातील कर्मचारी कै.विशाल हणमंतराव जाधव यांना “शहिद” दर्जा देण्यास व शहिदांना अनुदेय असणा-या सवलती व फायदे देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-----

**विषय क्रमांक ३)** संदर्भ – १) मा.राजेंद्र लांडगे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव–

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.६०८४ दि.११/१२/२०१९

पुणे महानगर परिवहन महामंडळातर्फे पुणे व पिंपरी चिंचवड शहर व त्यापुढे २० कि.मी.पर्यंत सार्वजनिक बससेवा पुरविली जाते. परिवहन महामंडळाच्या ताफ्यात सध्या सुमारे २१०० बसेस असून पुढील वर्षभरात सी.एन.जी. व इलेक्ट्रीक मिळून नव्याने १००० बसेस दाखल होणार आहेत. या नविन बसेससाठी महामंडळाच्या कार्यक्षेत्रात सर्व महत्वाच्या परिसरात बसडेपो असणे आवश्यक आहे. याकरिता महामंडळाने महापालिकेकडे वाकड जकात नाका व च-होली जकात नाक्याची मागणी केली होती. त्यानुसार च-होली येथील जागा महामंडळाच्या ताब्यात देण्यात आली असून वाकड जकात नाक्याची जागा ताब्यात देणेबाबत कार्यवाही सुरु आहे. या दोन ठिकाणी विकसन केल्यास तेथे बसपार्कींग व बस संचलन योग्य पध्दतीने करता येवू शकेल. याद्दष्टीने सदरची जागा डेपोकरिता विकसित करणेसाठी खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देऊन या कामाचा सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात समावेश करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | पान क्र. | अ. क्र. | लेखा-शिर्ष | प्रशासकीय मान्यता र.रु | सन २०१९-२० ची तरतूद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | च-होली स.नं.१२१, १३० या ठिकाणी पीएमपीएमएल च्या बसगाडया उभ्या करणेसाठी डेपो विकसित करणे. | | | नविन काम | १२,००,००,०००/ | ० | २,००,००,०००/ | ० |
| २ | वाकड जकात नाका या ठिकाणी पीएमपीएमएल च्या बसगाडया उभ्या करणेसाठी डेपो विकसित करणे. | | | नविन काम | ११,००,००,०००/ | ० | २,००,००,०००/ | ० |
| ३ | भुसंपादन निधी | २७४ | ३ | | | १४०,००,००,०००/ | | ४,००,००,०००/ |
| | | | | | | | ४,००,००,०००/ | ४,००,००,०००/ |

वरील प्रमाणे सदरच्या कामाचा सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात समावेश करुन प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४,००,००,०००/-)

**विषय क्रमांक ४)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षेका/वि/१/कावि/२९४

दिनांक ०९/१२/२०१९

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.६०८५ दि.११/१२/२०१९

मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत स्थापत्य विभागाकडून विविध विकासकामे चालू असून त्यास अनुषंगिक विद्युत विषयक कामे या विभागाकडून करणे आवश्यक आहे. तथापि यापूर्वी या विद्युत विषयक कामाचा समावेश स्थापत्य विषयक कामासमवेत करणेत आला होता. तथापि मा.आयुक्त यांनी दिलेल्या सुचनांनुसार सदर कामे विद्युत विभागाकडून स्वतंत्ररित्या करण्याचे ठरले आहे. त्यामुळे या

कामाचा समावेश विद्युत विभागाच्या अंदाजपत्रकात करणेत आलेला नाही. सदर कामाच्या स्थापत्य विषयक निविदा प्रसिध्द करण्यात आल्या असून त्यातील ५ कामे प्रत्यक्ष सुरु करण्यात आलेली आहेत. परंतु विद्युत विषयक कामाच्या निविदा काढल्या नसल्याने स्थापत्य विषयक कामे करण्यास अडथळा येत आहे. प्रस्तावात नमुद प्रमाणे कामांचा समावेश अंदाजपत्रकात करुन या कामासाठी पुरेशी तरतूद करणे आवश्यक आहे. सबब सोबतचे प्रपत्र "अ" नुसार याकामासाठी वाढ/घट करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५,८५,००,०००/-)

------

**मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समितीचे ठराव**

**विषय क्रमांक ५)** संदर्भ – १) मा.अभिषेक बारणे, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.
२) मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समितीकडील ठराव क्र. ५९ दि.३०/११/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात खेलरत्न, अर्जुन, शिवछत्रपती पुरस्कारार्थी रहात आहेत. या पुरस्कारार्थी यांची माहिती नागरिकांना होण्याच्या दृष्टीने त्यांच्या निवासाकडे जाणेकामी दिशादर्शक फलक बसविणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात रहात असलेले व भविष्यात घोषित होणारे खेलरत्न, पद्मश्री, अर्जुन व शिवछत्रपती पुरस्कारार्थी यांचे निवासाकडे जाणेकामी दिशादर्शक फलक बसविणेस व त्याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-----

**मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे/काम**

**विषय क्रमांक ६)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.नरवि/कावि/१२/४२/२०१९ दि.११/११/२०१९

मौजे बोपखेल येथील मुळा नदीवर पुलासाठी संरक्षण विभागाच्या मालकीच्या रस्त्यासाठी जागा हस्तांतरणाबाबत संरक्षण विभागास पर्यायी जागा देणे संदर्भात महसूल व वन विभागामार्फत कार्यवाही सुरू असून बोपखेल पुलासाठी संरक्षण विभागाच्या १६१२२ चौ.मी. जागेच्या बदल्यात पर्यायी जागा म्हणून संरक्षण विभागाच्या ताब्यातील राज्य शासनाची मौजे येरवडा येथील स.नं.२०२/२ (सि.स.नं.२१६२) मधील एकूण ४.३८ हे-आर जागेपैकी र.रू.२५,८१,५१,२००/- इतक्या Equal value land (EVL) सममुल्याची ७३६७.०३ चौ.मी. इतकी जागा प्रदान करण्याबाबत प्रस्तावित केले असून जागेच्या प्रचलित बाजार भावानुसार होणारे मुल्य वसुल करणे आवश्यक असल्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस राज्यशासनास सदर मुल्य अदा करणे आवश्यक असून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरून शासन स्तरावर प्रकरणी निर्णय घेण्याची कार्यवाही चालू असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा अभिप्राय तात्काळ शासनास सादर करणेबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.याचिका-३०१८/प्र.क्र.५८३/नवि-२२, दि.५/१०/२०१९ अन्वये कळविणेत आले आहे. बोपखेल गावासाठी दापोडी येथून CME हद्दीतून जाणारा रस्ता मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये दि.१३/५/२०१५ रोजी CME द्वारे बंद करण्यात आला होता. त्यामुळे बोपखेल गावासाठी रस्ता उपलब्ध करून देणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मुळा नदीवरील पुल ते

खडकीतून जाणारा ElphistoneRoad व्हाया टँक रोड हा रस्ता पक्क्या स्वरुपात करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण करण्यात येऊन Defense Estate Officer (DEO) यांचेकडे बोपखेल वासियांसाठी मुळा नदीवर पुल व पक्का रस्ता बांधणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदर प्रस्तावास अनुसरून Defense Estate Officer (DEO) पुणे यांचेकडे पाठविणेत आलेले पत्रक्र.Civil/BRTS/११७८/२०१८ दि.०९/०५/२०१८ च्या अनुषंगाने मा.स्थायी समितीसभा ठराव क्र.२६३७ दि.०९/०५/२०१८ अन्वये व मा.महापालिका सभा ठराव क्र.२०३दि.२२/०६/२०१८ अन्वये उक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.तथापि सदरमंजूर ठरावामध्ये जागेच्या खर्चाबाबत मान्यतेच्या निर्णयाची स्पष्ठता होतनसल्यामुळे सदर ठरावामध्ये दुरूस्ती करणे आवश्यक आहे. मौजे बोपखेल येथील मुळा नदीवरील पुलासाठी महानगरपालिका हद्दीबाहेरील संरक्षण विभागाच्या ताब्यातील १६१२२ चौ.मी. जागेच्या बदल्यात पर्यायी जागा म्हणून संरक्षण विभागाच्या ताब्यातील राज्य शासनाची मौजे येरवडा येथील स.नं.२०२/२ (सि.स.नं.२१६२) मधील एकूण ४.३८ हे-आर जागेपैकी र.रू.२५,८१,५१,२००/- इतक्या Equal value land (EVL) सममुल्याची ७३६७.०३ चौ.मी. इतकी जागा प्रदान करण्याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस हद्दीबाहेरील कामासाठी राज्यशासनास सदर जागेचे मुल्य र.रू.२५,८१,५१,२००/- अदा करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ७)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.नरवि/कावि/३६/१६५/२०१९ दि.२१/११/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्मार्ट सिटी अंतर्गत पिंपळे गुरव परिसरामध्ये Area Based Development अंतर्गत पिंपळे गुरव येथील स.नं. ४१ मधील आ.क्र. ३४७ खेळाचे मैदान विकसित करण्याचे नियोजन आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र १.०० हेक्टर एवढे असून यापैकी ०.४९ हेक्टर महानगरपालिकेच्या टी.डी.आर.ने ताब्यात आलेले असून उर्वरीत ०.५१ हेक्टर एवढे क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले नाही. सदर क्षेत्र टी.डी.आर.च्या बदल्यात मनपाच्या ताब्यात देणेबाबत मिळकत धारकाना वारंवार विनंती केलेली आहे. परंतु मिळकतधारक प्रतिसाद देत नाही. तसेच दि.१६/०९/२०१९ रोजीच्या पत्राने सहमुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवडस्मार्ट सिटी.लि. यांनी सदर क्षेत्र भूसंपादनाने मनपाच्या ताब्यातघेणेबाबतची मागणी केलेली आहे. सदर जमिनिचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सहभूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचाआणि पारदर्शक्ता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये भूसंपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ८)** मा.अति.आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.स्वभाअक/३/कावि/२१९/२०१९ दिनांक ०७/१२/२०१९

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्रशौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारीमुक्त करणे

(Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे.राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्धकरणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासनयांचेकडून अनुक्रमे र.रु.४,९३,१४,९६१/- व र.रु.९,१०,५४,९७४/- असे एकुण र.रु.१४,०३,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु.४,०००/-, राज्य शासनाचे र.रु.८,०००/- व मनपा हिस्सा र.रु.४,०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/११/२०१९ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे –

**प्रपत्र अ**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्जकेलेल्या कुटुंबांची संख्या | | १७४९० | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान” च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १७४९० | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १५१५६ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण - १५१५८ | मनपामार्फत बांधकाम पुर्ण- १०४२१ सी.एस.आर. (एनजीओ) मार्फत बांधकाम - ४७३७ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला – २६२ सिटस कामकाज पूर्ण पुरुष – ३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | १०८१० लाभार्थी | GOI+GOM = ६४८.६० लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB =२१६.२० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८६४.८० लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १०१६४ लाभार्थी | GOI+GOM = ६०९.८४लाख | GOI = २०००/-व GOM = ४०००/-हिस्सा |
| | | ULB =२०३.२८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८१३.१२ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्रअभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे.

**विषय क्रमांक ९)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वैद्य/१४अ/कावि/११९०/२०१९
दिनांक ११/१२/२०१९

पिंपरी चिंचवड मनपाच्या सेवेतील व सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी दि. ०१/०९/२०१५ पासून धन्वंतरी स्वास्थ योजना सुरु करण्यात आली आहे. तथापी मा.महापालिका ठराव क्र.३८८,दि.२२/०२/२०१९ अन्वये धन्वंतरी स्वास्थ योजना धोरण २०१३ बंद करून त्याऐवजी वैद्यकिय विमा बाबतचे नव्याने निश्चित केलेले धोरण लागू करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रस्तावित वैद्यकिय विमा लागू करणे संबंधी निविदा मागविणेत आल्या असून निविदा स्विकृतीची कार्यवाही चालू आहे. सन २०१९ – २०२० मध्ये या योजनेसाठी र.रु.१५ कोटी इतकी तरतूद करणेत आलेली होती. तथापी सध्या चालू असलेल्या धन्वंतरी योजनेतील प्रलंबित बिले भागविणेकामी तरतूद कमी पडत असलेने विमा योजनेच्या र.रु.१५ कोटी तरतूदी मधून र.रु.६ कोटी धन्वंतरी स्वास्थ योजना या लेखाशिर्षावर वर्ग करणेत आलेली आहे. त्यामुळे सध्या विमा योजनेसाठी र.रु.९ कोटी इतकीच तरतूद शिल्लक आहे. विमा योजनेसाठी प्रिमिअमचा पहिला हप्ता भागविणेकामी आणखी र.रु.५ कोटीची आवश्यकता लागणार असून सदरची तरतूद वैद्यकिय मुख्य कार्यालया कडील स्थायी अस्थापना या लेखाशिर्षा वरील शिल्लक रक्कमेतून वर्ग करुन उपलब्ध करणे शक्य आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे –

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१९ –२०२० मूळ तरतूद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय मुख्य कार्यालय स्थायी अस्थापना | ४८ कोटी | - | ५ कोटी |
| २ | वैद्यकिय विमा | ९ कोटी | ५ कोटी | - |

तरी वरील प्रमाणे वर्गीकरण करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.
(वाढ/घट र.रु.५,००,००,०००/-)

-----

## समित्यांचेअहवाल

## मा.विधी समिती

**विषय क्रमांक १०)** अ) दिनांक २०/०९/२०१९, चा सभावृत्तांत कायम करणे.

----

## मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक ११)** अ) दिनांक १३/०९/२०१९, चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक २६/०९/२०१९, चा सभावृत्तांत कायम करणे.

--------

## मा.शहरसुधारणासमिती

**विषय क्रमांक १२) अ)** दिनांक ११/०९/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक २५/०९/२०१९ व १३/११/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.

## मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिकसमिती

**विषय क्रमांक १३) अ**) दिनांक १३/०९/२०१९ व १६/०९/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/५/कावि/३०४/२०१९
दिनांक : ११/१२/२०१९

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

**डक्षेका/वि/१/कावि/२९४/२०१९ दि.०९/१२/२०१९ विषय क्र ४.चे लगत(**

प्रपत्र -अ

| अ.क्र. | लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | अंदाजपत्रकातील पानंक व अनु.क्र. | स्थापत्य विषयक कामाची स्थिती | प्रशासकिय मान्यता रक्कम | उपलब्ध तरतुद | घट | वाढ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थापत्य प्रकल्पांतर्गत विद्युत विषयक कामे करणे. | | | | | | |
| १ | प्रभाग क्र.२५ ताथवडे गावातून जिवननगरमार्गे पुनावळे गावाकडे जाणारा डी.पी. रस्त्यांवर विद्युत विषयक कामे करणे. | | काम चालु | ६०००००००० | 0 | ० | २५०००००० |
| २ | प्रभाग क्र.२५ ताथवडे येथील सर्व्हे नं.६९ पासून व्हिजन-१ मॉलकडे जाणारा २४.०० मी. रूंद डी.पी. रस्त्यांवर विद्युत विषयक कामे करणे. | | काम चालु | ४०००००००० | ० | ० | ० |
| ३ | प्रभाग क्र. २५ मधील वाकड काळाखडक ते वाकड पोलीस चौकीकडे जाणारा डी.पी. रस्त्यांवर विद्युत विषयक कामे करणे. | | काम चालु | २०००००००० | ० | ० | १०००००००० |
| ४ | बी.आर.टि.एस. कॉरिडॉर क्र.३ वाकड येथील पुणे- बँगलोर महामार्गावरील पुलापासुन हिंजवडी हद्दीपर्यंत रस्ता विकसित करणे. या कामातील विद्युत विषयक कामे करणे. | | काम चालु | ३०००००००० | ५०००००० | ० | १७०००००० |
| | उद्याने (ड प्रभाग) | | | | | | |
| ५ | पिंपळे निलख आ.क्र. ३९८ येथे उद्यान विकसित करणे | | काम चालु | ३,००,००,०००/- | ० | ० | ६५००००० |
| | सायन्स पार्क - मुख्य कार्यालय | | | | | | |
| ६ | पिंपरी चिंचवड सायन्स पार्क येथे इनोव्हेशन हब तयार करणेबाबत अनुषंगीक कामे करणे. | ३६१/१ | | ५०००००००० | १२५०००००० | १२०००००० | ० |
| ७ | पिंपरी चिंचवड सायन्स पार्क टप्पा-२ करणेबाबत अनुषंगीक कामे करणे. | ३६२/२ | | १०००००००० | १७५०००००० | १६५०००००० | ० |
| | उद्याने (अ प्रभाग) | | | | | | |
| | उच्च व लघुदाब पोल व तारा हलविणे ( अ प्रभाग) | | | | | | |
| ८ | प्रभग क्र. १५ मधील भक्ती शक्ती येथील पुणे महानगर परीवहन महामंडळ लि. बस स्थनकामध्ये चार्जिंग पॉइंट साठी विद्युत विषयक कामे करणे.(सन २०१९-२०) | ३३४/२ | | १५०००००००० | ५००१०००० | ३००००००० | ० |
| | | | | एकुण | १२६९३०४८५ | ५८५०००००० | ५८५०००००० |

कार्यकारी अभियंता (विद्युत)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८